**आर सी सी क्र. २५०/२०१५**
**नि. ९५**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र.४**
मी सत्य प्रतिज्ञेवर सांगतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | - राधा ज्योतीराम शेळके |
| वय | - ३० |
| कामधंदा | - शेती |
| राहणार | - भातकुडगाव, ता. शेवगाव |

<u>सरतपास सरकारी वकिल श्री एस. एस. दराडे यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>

१. मी आरोपी क्र १ ते ४ यांना ओळखते. आज रोजी न्यायालयात आरोपी क्र १ परशुराम हजर आहे. फिर्यादी माझे पती आहेत. घटना दहा वर्षापूर्वी दि.१०.५.२०१५ रोजी घडली होती. घटना बालमटाकळी येथील शेळके वस्तीत दुपारचे ३ ते ३.३० च्या दरम्यान घडली होती. त्यादिवशी मी, माझे पती माझी मुलगी आणि सासरे माझ्या माहेरी चाललो होतो. त्यावेळी आरोपी क्र १ परशुराम कदम, आरोपी क्र २ ताराचंद, पप्पू अकोलकर आणि गोटू अकोलकर यांनी माझ्या पतीला गजाने आणि काठीने मारहाण केली. आणि जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर त्यांना सोडले आणि माझ्या पतीला सरकारी दवाखान्यात आणले होते. माझ्या पतीचे डाव्या हाताचे बोट फॅक्चर झाले होते. मी पप्पू अकोलकर आणि गोटू अकोलकर यांना पाहिल्यास ओळखू शकते. ते आज रोजी न्यायालयात हजर नाही.

सरतपास संपला

<u>उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री. एल एच लांडे यांच्यामार्फत</u>

२. घटनेबद्दल पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. माझे शिक्षण इयत्ता १२ वी पर्यंत झाले आहे. पोलीसांनी माझा जबाब कोणत्या तारखेला आणि कुठे घेतला होता हे मला सांगता येणार नाही. घटनेनंतर चार ते आठ दिवसांनी माझा जबाब घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर माझी आणि पोलीसांची प्रत्यक्ष भेट आणि चर्चा झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी १२ वी पर्यंत शिकल्यामूळे मला लिहीता वाचता येते. पोलीसांनी नोंदवलेला जबाब मी वाचला होता. पोलीसांनी माझा जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की मी पोलीसांना जबाब देतेवेळी <u>मी, माझे पती, माझी मुलगी आणि सासरे माझ्या माहेरी चाललो होतो हे सांगितले नव्हते.</u> <u>गजाने मारहाण केली होती</u> हे मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले होते. <u>त्यानंतर त्यांना सोडले माझ्या पतीला सरकारी दवाखान्यात आणले होते</u> हे मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले होते. <u>मी, माझे पती, माझी मुलगी आणि सासरे माझ्या माहेरी चाललो होतो हे सांगितले नव्हते.</u> <u>गजाने मारहाण केली होती, त्यानंतर त्यांना सोडले माझ्या पतीला सरकारी दवाखान्यात आणले होते</u> हे माझ्या जबाबात

पोलीसांनी का लिहिले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की घटना घडली त्यावेळी मी घटनेच्या ठिकाणी नव्हते. मी माझ्या पतीच्या पाठीमागे १० ते १५ फूट अंतरावर होते. घटना घडल्यानंतर मी त्याठिकाणी २५ मिनीटांनी पोहोचले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी मी आणि माझी मुलगी आम्ही दोघीच तेथे होतो आणि आमच्या व्यतिरिक्त तेथे कोणी नव्हते. साक्षीदार स्वतःहून सांगते की सासरे पण होते. घटना घडली त्यावेळी माझ्या पतीला मी आणि माझ्या सास-यांनी दवाखान्यात नेले होते. माझ्या पतीला गाडीवर माझ्या सास-याने नेले होते आणि त्यांच्या पाठीमागून मी गेले होते. त्यांच्या पाठीमागून मी लगेच अर्ध्या तासाने गेले होते. हे म्हणणे खरे आहे की मी घटनास्थळी जाण्याआधी माझ्या सास-यांनी माझ्या पतीला दवाखान्यात नेले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर माझी आणि माझ्या पतीची भेट थेट दवाखान्यात झाली होती. माझी आणि माझ्या पतीची दवाखान्यात ५.०० वा. भेट झाली होती. त्यानंतर माझे आणि माझ्या पतीचे बोलणे १० मिनीटांनी झाले होते. हे म्हणणे खरे आहे की मी जेव्हा माझ्या पतीला दवाखान्यात भेटायला गेले होते तेव्हा ते बेशुध्द पडले होते. मी गेल्यावर ५ मिनीटांनी माझे पती शुध्दीवर आले.

प्रश्न तुमचे पती शुध्दीवर आल्यावर त्यांनी काय केले ?

उत्तर त्यांनी मला काही सांगितले नाही.

३. मी त्यांना काही विचारले नाही. हे म्हणणे खरे आहे की दवाखान्यात माझे पती आराम करत होते, त्यादिवशी ते मला काही बोलले नाही आणि मी देखील त्यांना काही विचारले नाही. मी सिवील हॉस्पीटल अहमदनगर येथून आठ दिवसांनी घरी परत आले. हे म्हणणे खरे नाही की दवाखान्यात असताना माझ्या पतीने मला घटनेची हकिकत सांगितली होती.

४. हे म्हणणे खरे आहे की माझ्या पतीकडे बुलेट मोटारसायकल आहे. हे म्हणणे खरे आहे की या घटनेच्या पूर्वीपासून माझे पती बुलेट मोटारसायकल चालवतात. हे म्हणणे खरे आहे की बालमटाकळी ते बाडगव्हाण हा रस्ता अतिशय खराब रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की तो रस्ता खडयांचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की या खराब आणि खडयांच्या रस्त्यामूळे माझ्या गावातले अनेक लोक त्या रस्त्याने जाताना पडलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की माझे पती बालमटाकळी ते बाडगव्हाण या रस्त्याने त्यांच्या मोटारसायकलवरुन जात असताना त्या रस्त्यावरील खडयाने त्यांची मोटारसायकल घसरली आणि त्यामूळे त्यांना जखमा झाल्या. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र १ परशुराम यांनी आमच्यावर केलेली एक केस प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की या जुन्या वादावरुन आणि माझे पती ज्योतीराम मोटारसायकलवरुन पडल्यामूळे त्यांना झालेल्या जखमांचा आधार घेउन मी आणि माझ्या पतीने ठरवून आरोपीविरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी प्रत्यक्ष

घटनेच्या ठिकाणी हजर नसल्यामूळे मला घटनेविषयी काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सांगते तशी कोणतीच घटना घडलेली नसून आरोपीने माझ्या पतीला मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीने दिलेल्या फिर्यादला मदत व्हावी म्हणून मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत नाही. बाळासाहेब श्रीधर झिरपे माझ्या नणंदेचे पती आहेत, जगन्नाथ विश्वनाथ शेळके माझे सासरे आहेत आणि संभाजी नारायण शेळके माझ्या गावातील आहे. हे म्हणणे खरे आहे की संभाजी नारायण शेळके यांच्याशी आमचे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्यांच्या घरी आमचे येणे जाणे आहे. बाळासाहेब अर्जुन झिरपे हे माझ्या नणंदेचे पती आहेत. कडूबाई सर्जेराव पोकळे माझी आई आहे. हे म्हणणे खरे आहे की या प्रकरणातील सर्व साक्षीदार आमचे नातेवाईक असल्यामूळे मी आणि माझ्या पतीने या प्रकरणात त्यांची नावे साक्षीदर म्हणून समाविष्ट केली आहे. हे म्हणणे खरे आहे की आम्ही या सर्व नातेवाईकांना तुम्ही या प्रकरणात आमची मदत करा, तुमची नावे साक्षीदार म्हणून टाकलेली आहे असे सांगितले होते.

प्रश्न या प्रकरणात समाविष्ट केलेले सगळे साक्षीदार तुमचे नातेवाईक असल्याने ते तुमच्या बाजुने साक्ष देण्यासाठी तयार आहेत म्हणुन त्यांची नावे तुम्ही टाकलेली आहेत ?

उत्तर आहे.

**न्यायालयीन नोंद सदरचा प्रश्न विचारल्यावर साक्षीदार बराच वेळ गप्प होती.**

५. हे म्हणणे खरे नाही की, या साक्षीदारांना घटनेविषयी काहीही माहिती नाही आणि केवळ नातेवाईक असल्यामुळे त्यांची नावे या प्रकरणात साक्षीदार म्हणुन टाकलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझा जबाब घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने दिलेल्या फिर्यादला मदत व्हावी व आरोपींना त्रास देण्यासाठी मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

**sd/-**
(श्रीमती एस यू जागुष्टे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
शेवगाव

दि. १३.३.२०२४